# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांक:13.11.2025** **वारः गुरुवार**

---

•दिल्ली कारस्फोटातील जीवितहानीबद्दल मंत्रिमंडळाचा शोकप्रस्ताव

•गुजरात दहशतवादी कटासंदर्भात राष्ट्रीय तपास यंत्रणेकडून पाच राज्यांत छापे

•द्विपक्षीय करारांतर्गत बोत्सवानाकडून भारताला आठ चित्त्यांचं हस्तांतरण होणार

•गेल्या दशकभरात देशातल्या क्षयरुग्णांच्या संख्येत घट झाल्याचं जागतिक आरोग्य संघटनेचं निरीक्षण

•आणि

•दृष्टीहीन महिलांच्या २० षटकांच्या क्रिकेट सामन्यांच्या विश्व करंडक स्पर्धेत भारतीय संघाची ऑस्ट्रेलियावर मात

**<u>मंत्रीमंडळमौनस्फोट</u>**

केंद्रीय मंत्रीमंडळाने दिल्लीत झालेल्या कारस्फोटातील जीवितहानीबद्धल तीव्र शोक व्यक्त करणारा ठराव काल मंजूर केला. मंत्रिमंडळाने दोन मिनिटांचे मौन पाळले. राष्ट्रीय सुरक्षा आणि प्रत्येक नागरिकाच्या सुरक्षेसाठी सरकार कायमच वचनबद्ध असल्याचं आणि देशाच्या नागरिकांचं जीवन आणि कल्याण सुरक्षित करण्याच्या दृढ संकल्पाला मंत्रिमंडळाने पुन्हा एकदा मान्यता दिली. केंद्रीय मंत्रीमंडळाच्या बैठकीनंतर माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी वार्ताहरांना ही माहिती दिली. मंत्रिमंडळानं या भ्याड हल्ल्याचा निषेध करत, या हिंसाचारातल्या बळी पडलेल्या शोकग्रस्त कुटुंबाप्रती मंत्रीमंडळानं संवेदना व्यक्त केल्याचं त्यांनी स्पष्ट केलं. त्याचबरोबर, सर्व प्रकारच्या दहशतवादासंदर्भातल्या शून्य सहिष्णूता धोरणाचा पुनरूच्चार केला.या घटनेची चौकशी अत्यंत तत्परतेने आणि कुशल पद्धतीने केली जावी असे निर्देशही मंत्रीमंडळाने दिले आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक पार पडली.

**<u>पंप्रदिल्ली</u>**

तत्पुर्वी, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भूतानच्या दौऱ्यावरून दिल्लीत परत आल्यावर लगेचच कारस्फोटातील जखमींची भेट घेऊन त्यांच्याशी संवाद साधला. तसंच रुग्णालयातील वैद्यकीय अधिकाऱ्यांशी चर्चा केली. त्यानंतर समाजमाध्यमांवरील संदेशातून, त्यांनी हा कट रचणाऱ्या दोषींना शिक्षा होईल असं म्हटलं आहे.

**<u>कारफरीदाबाद</u>**

दरम्यान, उत्तरप्रदेशातल्या फरीदाबाद इथं एक लाल रंगाची संशयित चारचाकी स्थानिक पोलिसांनी ताब्यात घेतली आहे. दिल्ली कारस्फोटामध्ये सामील असल्याच्या संशयावरून खांडवली गावानजीक लावलेली ही कार पोलिसांनी ताब्यात घेतली. पोलिसांनी  काल दिल्लीतील सर्व पोलीस स्थानक,सीमा तपासणी नाके तसंच हरयाणा, उत्तर प्रदेश पोलिसांसाठी दक्षतेचा इशारा जारी केला आहे.

**<u>एनआयए</u>**
प्रतिबंधित दहशतवादी संघटना अल कायदाने रचलेल्या गुजरात दहशतवादी कट प्रकरणी, राष्ट्रीय तपास यंत्रणेनं काल पाच राज्यातील १० ठिकाणांवर छापे टाकले. पश्चिम बंगाल, त्रिपुरा, मेघालय, हरियाणा आणि गुजरात या राज्यांतील निवडक ठिकाणी छापे घातले. या प्रकरणात बेकायदा बांग्लादेश निर्वासितांचा सहभाग आहे. तपास यंत्रणेनं जारी केलेल्या निवेदनात, छाप्यांदरम्यान अनेक डिजीटल उपकऱणे आणि गुन्हेगाऱीशी निगडीत कागदपत्रे जप्त करण्यात आली असून, न्यायवैद्यक विश्लेषणासाठी पाठवण्यात आल्याचं म्हटलं आहे.

**<u>राष्ट्रपती</u>**
प्रोजेक्ट चित्ता अंतर्गत भारतातील चित्त्यांची संख्या वाढविण्यासाठी बोत्स्वाना आज आठ चित्ते भारताला हस्तांतरित करणार आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि बोत्सवानाचे राष्ट्रपती डुमा बोको यांच्यातील द्विपक्षीय चर्चेच्या अखेरीस संयुक्त पत्रकार परिषदेत काल ही घोषणा करण्यात आली. दोन्ही देशांमधील वन्यजीव संवर्धनात द्विपक्षीय सहकार्याचा एक नवीन अध्याय यातून सुरु होत आहे. बोत्सवानाच्या पाठिंब्याबद्दल आभार मानताना, राष्ट्रपती मुर्मू यांनी भारत या चित्त्यांची चांगली काळजी घेईल असं **<u>सांगितलं</u>**.

दरम्यान, दोन्ही राष्ट्रपतींच्या द्विपक्षीय चर्चेनंतर, आरोग्यसेवा आणि औषधनिर्माण क्षेत्रातील सामंजस्य करार करण्यात आले. भारतानं बोत्सवानाला एचआयव्हीवरील उपचारांसाठी एआरव्ही औषधं पुरवण्याची घोषणा देखील केली होती. राष्ट्रपती मुर्मू यांनी बोत्सवानाच्या संसद सदस्यांना संबोधित केलं आणि एका हिरे व्यापार कंपनीलाही भेट दिली. राष्ट्रपती मुर्मू बोत्सवानातील भारतीय समुदायाच्या सदस्यांशी आज संवाद साधणार आहेत त्यानंतर त्या मायदेशी परत येतील.

**<u>जयशंकर</u>**
परराष्ट्र व्यवहार मंत्री एस. जयशंकर यांनी जी सात देशांच्या परराष्ट्र मंत्र्यांच्या बैठकीत, ऊर्जा सुरक्षा आणि दुर्मिळ महत्त्वाच्या खनिजांसंबंधीच्या संपर्क सत्रात सहभाग घेत भारताचा दृष्टीकोन विशद केला. या बैठकीत सहभागी होण्यासाठी परराष्ट्र मंत्री कॅनडाच्या दौऱ्यावर गेले आहेत. भारताचा दृष्टीकोन स्पष्ट करताना, या दोन्हींवरील अवलंबित्व कमी करणे, अंदाजक्षमता आणि लवचिकता निर्माण करण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली. यादृष्टीने आंतरराष्ट्रीय सहकार्य हाच एकमेव मार्ग असून, भारत आंतरराष्ट्रीय भागीदार देशांसमवेत रचनात्मक कार्य करण्यास तयार असल्याचं नमूद केलं.

तत्पुर्वी, जयशंकर सागरी सुरक्षा आणि समृद्धी याविषयीच्या दुसऱ्या सत्रातही सहभागी झाले होते. महासागर दृष्टीकोन, हिंद-प्रशांत सहकार्य आणि देशांतर्गत बंदर नेतृत्व विकासाच्या माध्यमातून सागरी सुरक्षेविषयीचा भारताचा दृष्टीकोन अधोरेखित केला.

**<u>शेखावतआंतरराष्ट्रीयपर्यटन</u>**

ईशान्येकडील राज्यांसाठीच्या  १३व्या आंतरराष्ट्रीय पर्यटन प्रदर्शनाचं उद्घाटन सिक्कीममध्ये केंद्रीय पर्यटन आणि सांस्कृतिक मंत्री गजेंद्रसिंह शेखावत यांच्या हस्ते आज होणार आहे. चार दिवसांच्या या प्रदर्शनामधून ईशान्येकडील राज्यांची पर्यटन क्षमता प्रदर्शित होईल असं पर्यटन मंत्रालयानं म्हटलं आहे. शाश्वत आणि सर्वसमावेशक पर्यटनाला प्रोत्साहन देताना या राज्यांमधील निसर्गसौंदर्य, सांस्कृतिक विविधता आणि साहसी पर्यटनाच्या संधी अधोरेखित केल्या जातील.

**<u>क्षयरूग्णघट</u>**

देशात गेल्या दशकभरात, क्षयरुग्णांच्या संख्येत २१ टक्क्यांनी घट झाली असून ती जागतिक १२ टक्क्यांच्या सरासरीपेक्षा जवळपास दुप्पट असल्याचं, जागतिक आरोग्य संघटनेच्या जागतिक क्षयरोग अहवाल २०२५मध्ये नमूद करण्यात आलं आहे. देशातील क्षयरुग्णांचं प्रमाण २०१५मध्ये प्रतिलाख २३७ होतं तर २०२४मध्ये ते प्रति लाख १८७ झालं आहे. आरोग्य मंत्रालयानं म्हटलं आहे की, देशांतर्गत सुधारित रूग्ण शोधण्याच्या दृष्टीकोनामुळे निदान आणि उपचारांची व्याप्ती वाढली आहे. त्यामुळे बहुऔषध प्रतिरोधक क्षयरुग्णांमध्ये लक्षणीय वाढ झाली नाही. तसंच क्षयरोगामुळे होणाऱ्या मृत्युदरातही घट झाली असून, २०१५मध्ये मृत्यु दर प्रतिलाख २८ होता, तो गेल्या वर्षी प्रतिलाख २१ झाला आहे. देशातून क्षयरोगाचं उच्चाटन करण्यासाठी क्षयरोगमुक्त भारत अभियान,नि-क्षय पोषण योजनांसारखे विविध उपक्रम सरकार राबवते आहे.

**<u>क्रेडीटमंत्रिमंडळ</u>**

केंद्रीय मंत्रीमंडळाने निर्यातदारांसाठी नवीन पत हमी योजना मंजूर केली आहे. यामुळे सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग क्षेत्रातल्या निर्यातदारांना १०० टक्के पतपुरवठा हमी देईल. योजनेमध्ये २० हजार कोटी रुपयांपर्यंतचे अतिरिक्त कर्ज प्रदान करेल तसंच, पैशांची उपलब्धता बळकट करेल तसंच भारताची जागतिक स्पर्धात्मकता वृद्धिंगत होईल. दिल्लीत केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी मंत्रिमंडळाच्या निर्णयांविषयी माध्यमांना माहिती दिली

त्याशिवाय मंत्रिमंडळानं सिझियम, ग्रेफाइट, रुबिडियम आणि झिरकोनियम यासारख्या प्रमुख खनिजांसाठी रॉयल्टी दरांमध्ये सुधारणा केली आहे. त्यामुळे खनिजांच्या क्षेत्रांच्या लिलावाला प्रोत्साहन मिळेल आणि काही महत्त्वाच्या खनिजांचे देशांतर्गत उत्पादन वाढून आयात कमी होईल, पुरवठा साखळीतील अडचणी कमी होतील आणि भारतात अधिक रोजगाराच्या संधी निर्माण होतील.

याच बैठकीत, २५ हजार कोटी रुपयांपेक्षा अधिक खर्चाच्या निर्यात प्रोत्साहन अभियानालाही मंजुरी दिली. पुढील वर्षाच्या केंद्रीय अर्थसंकल्पा भारताची निर्यात स्पर्धात्मकता बळकट करण्यासाठी सूक्ष्म, लघु आणि मध्य उद्योगांसह निर्यातदार, कामगार केंद्रित क्षेत्रांसाठी हा उपक्रम राबवण्यात येणार आहे.

**बिहार**

बिहारमधील विधानसभा निवडणुकीची मतमोजणी उद्या सकाळी आठ वाजल्यापासून होणार आहे. ३८ जिल्ह्यांमधील ४६ मतमोजणी केंद्रांवर मतमोजणी केली जाईल. नमुना १७ क आणि ईव्हीएम डाटा जुळत नसल्यास आणि मॉक पोल डाटा चुकून मिटवला गेला नाही तिथं व्हीव्हीपॅट मोजणी अनिवार्य करण्याचे निर्देश निवडणूक आयोगाने दिले आहेत.

**एसआयआर**

मतदार यादी पुनर्रीक्षण कार्यक्रमाच्या दुसऱ्या टप्प्यात, ३७ कोटी मोजणी अर्ज वितरीत केल्याची माहिती निवडणूक आयोगानं दिली आहे. या टप्प्यात ५१ कोटी मतदार सहभागी होणार असून, आतापर्यंत ७० टक्के अर्ज वितरीत झाले आहेत. या टप्प्यात, ९ राज्ये आणि तीन केंद्रशासित प्रदेश सहभागी आहेत.

**आदिवासीव्यवसाय**

आदिवासी समुदाय हे नैसर्गिक संपत्ती आणि ज्ञान यांचे रक्षक आहेत असं प्रतिपादन केंद्रीय आदिवासी व्यवहार मंत्री जुआल ओराम यांनी काल केलं. आदिवासी व्यवसाय परिषदेच्या समारोपप्रसंगी ते दिल्लीत बोलत होते. आदिवासी प्रदेशांतील मोह, साल झाडाच्या बिया, हस्तकला आणि वनउत्पादनांमध्ये प्रचंड क्षमता आहे. या परिषदेच्या माध्यमातून ही क्षमता समृद्धीत रूपांतरीत करण्याचा संकल्प अधोरेखित होत असल्याचं ओराम म्हणाले.

**इस्रायलगाझाक्रॉसिंग**

उत्तरगाझामध्ये मानवतावादी मदत ट्रकना परवानगी देण्यासाठी झिकिम फाटक पुन्हा उघडलं असल्याचं इस्रायलनं म्हटलं आहे. इस्रायलकडून कडक तपासणी आणि निर्बंधांमुळं गाझाला मदत पोहोचवण्यात अडथळा निर्माण झाला आहे, असं मानवतावादी अधिकाऱ्यांचं म्हणणं आहे. मदतीचे ट्रक गाझामध्ये प्रवेश केल्यानंतरही,पायाभूत सुविधा नसल्यानं आणि लुटमारीच्या धोक्यामुळं लोकांपर्यंतवस्तुंचा पुरवठा वितरित करणं कठीण झालं आहे.

**दृष्टीहीनक्रिकेट**

दृष्टीहीन महिलांच्या २० षटकांच्या क्रिकेट सामन्यांच्या विश्व करंडक स्पर्धेत काल भारतीय संघानं ऑस्ट्रेलियाच्या संघावर २०९ धावांनी विजय मिळवला. नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना भारतीय संघानं २९२ धावा केल्या. ऑस्ट्रेलियाच्या संघाला मात्र २० षटकांत सर्व गडी बाद ८३ धावाच करता आल्या. भारतातर्फे कर्णधार दीपिकानं ५८ चेंडूत ९१ धावा केल्या.

## याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं नमस्कार.